MHST200006492020

## वि.दि.दा.क्र.११९/२०२३ मधील निशाणी क्र.१०२ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला पुरावा बंद आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा जाहीर ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत दाव्यात वादी क्रं.२ हिने तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि.२५.०६.२०१८ रोजी नि.७४ व दि.०४.०७.२०२२ रोजी नि.९७ नुसार दाखल केले आहे. त्यानंतर वादी यांना वारंवार संधी देवुन देखील ते उलटतपासासाठी उपस्थित राहिलेले नाहीत. त्यामुळे दिनांक १६.०६.२०२५ रोजी वादी यांचेविरुद्ध पुरावा बंदचा आदेश पारीत करणेत आला. परंतु, सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत वादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. उलटपक्षी त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्यांना याकामी पुरावा देण्यास परवानगी देणे न्यायोचित वाटते. परंतु, सदर दाव्यात झालेल्या विलंबाबाबत वादीवर खर्चाची जास्तीत जास्त रक्कम लादणे क्रमप्राप्त आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१) अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये १०००/- (रक्कम रुपये एक हजार फक्त) सरकार जमा करावी.

३) सदर खर्चाची पुर्तता केल्यानंतर वादीविरुद्ध झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येतो.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.09.09 17:47:39 +0530

स्थळ : वाई. (ए. ए. पाचरणे)
दिनांक : ०४/०९/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.